Amir Saheb20

पहा:-१). शासन महसुल व वन विभाग निर्णय क्र.जमीन१०/२००५/प्र.क्र.३८/ज-१.दि.७ /३ /२००६.
२) शासन महसुल व वन विभाग पत्र क्र.जमीन१०/२००६/प्र.क्र.८६/ज-१.दि.२०.१०.२००६.
३) मा.संचालक, समाज कल्याण संचालनालय, (म.रा.) पुणे यांचे अ.शा.प.क्रं.शिक्षण/ शासकिय जमिन/उपलब्धता/०५-०६/का ५ अ/२५७८ दि. १०.८.२००६.
४) विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, बीड यांचे प.क्रं.विजिसकअबी/नि.शा/जमीनी बाबत/२००७-०८/११५२. दि.३०/७/२००७.
५) उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांचे प.क्रं.२००७/जमा/बीडी./८१८४ दिं. ३१/१२/२००७.
६) या कार्यालयाचे पृष्टांकन दिं.११/१/२००८

क्रं.२००८/मशाका/२/जमा-१/३९.
जिल्हाधिकारी कार्यालय बीड.
दिनांक:- १६/१/२००८.

## आ दे श .

उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांनी त्यांचे संदर्भीय पत्र क्रं.५ नुसार सामाजिक न्याय विभागाकडील प्रस्तावित अनुसूचित जाती व नवबौध्द यांच्या मुला मुलींसाठी निवासी शाळा संकुल बांधण्यासाठी जलालपुर ता.परळी जि.बीड येथील शासकीय गायरान जमीन स.नं. ३० मधून २हे.४० आर जमीन विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, बीड यांना देणे बाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

शासनांच्या संदर्भ क्रं.१ व २ मधील निर्णयानुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन जिल्हाधिकारी बीड हे शासकीय जमीन स.नं.३० मौजे जलालपुर ता.परळी जि.बीड मधुन मुल्य रहीत २ हे.४० आर जमीन विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, बीड यांना परळी येथे सामाजिक न्याय विभागाकडील प्रस्तावित अनुसूचित जाती व नवबौध्द यांच्या मुला मुलींसाठी निवासी शाळा संकुल बांधण्यासाठी खालील अटीवर सदरील जमीनीचा आगावू ताबा देण्याचे आदेशीत करित आहे.

**चतु:सिमा:-**

पुर्वेस :- उर्वरित स.नं.३०. पश्चिमेस:- उर्वरित सर्वे नंबर ३०.
दक्षीणेस:- सर्वे नंबर २७. उत्तरेस :-उर्वरित सर्वे नंबर ३० व रस्ता.

**अटी .**

१. ज्या कामासाठी जमीनीचे विनियोजन करण्यांत आले आहे . त्याचा वापर त्याच कारणासाठी केला पाहीजे.त्या जमीनीचे हस्तांतरण,विक्री किंवा लीजवर खाजगी व्यक्तीस अथवा अन्य खात्यास जिल्हाधिकारी यांचे पुर्व परवानगी शिवाय करता येणार नाही.

२. उपरोक्त जमीनींची त्या खात्यास आवश्यकता नसेल तेंव्हा ती जमीन महसूल खात्यास ( शासनास ) परत करावी लागेल व त्या जमिनीची विल्हेवाट महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व त्या खालील नियमानुसार करण्यांत येईल.

३. जमीनींचा आगावू ताबा दिलेल्या दिनांकापासून त्या जमीनीचे संरक्षणाची जबाबदारी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, बीड यांची राहील.

४. महाराष्ट्र जमीन महसूल ( सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे ) नियम १९७१ चे नियम ६ मधील तरतुदीनुसार भोगाधिकार मुल्यरहीत व जमीन महसूल मुक्त जमीन देण्यांत आलेली असुन सदरील परिपूर्ण प्रस्ताव वरिष्टांना सादर करण्यांस आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्राची पुर्तता करुन देण्याची जबाबदारी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, बीड यांचीच राहील.

स्वाक्षरीत/-
**जिल्हाधिकारी बीड.**

(कृपया मागे पहा...)

प्रतिलिपी :-

१) मा.सचिव,महसूल व वन विभाग मंत्रालय,मुंबई यांना माहीतीस्तव सादर.

२) मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहीतीस्तव सादर.

३) संचालक, समाज कल्याण संचालनायल, महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांना माहितीस्तव सादर.

४) उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांना माहीतीस्तव.

५) तहसीलदार परळी यांना देवून कळविण्यात येते की,तालुका निरीक्षक भुमी अभिलेख परळी यांचे कडून या जमीनीची मोजणी करुन घेवुन मोजणी नकाशा प्राप्त करुन घेवुन जमीनीचा ताबा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, बीड यांना देवुन कब्जे पावती पंचनाम्यासह या कार्यालयास पाठवावी.

६) विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

७) नगर रचनाकार बीड यांना माहीतीस्तव.

८) तालुका निरीक्षक भुमी अभिलेख परळी यांना देवून कळविण्यात येते की, जमीनीची मोजणी करुन मोजणी नकाशाची प्रत तहसीलदार परळी यांना व,या कार्यालयास सादर करावी.

जिल्हाधिकारी बीड करिता.

D

१ - आहे   परळी वै.

२ - नोंद आहे

जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

जिल्ह[illegible]लय, बीड

([illegible]ा)

फोन क्र.०२४४२/२२२६०४   फॅक्स क्र.०२४४२/२२२०११

---

243

पहा:-१. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन-१०/२००५/प्रक्र.३८/ज-१/दिनांक ७/३/२००६.

२. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग परिपक्रएलएनडी-१०९०/२२०२३१/प्र.क्र.२०० ज-१दिनांक ५/४/१९९१.

३. कार्यकारी अभियंता(स्थापत्य) स्थापत्य विभाग म.रा.वि.वि.कंपनी मर्या. लातुर याचे पत्र दिनांक १५/०९/२०१४

४. उप विभागीय अधिकारी, परळी यांचे पत्र क्र २०१५/जमा/कावि-३०९ दिनांक २०/०२/२०१५

५. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन ०५/२०११/प्रक्र.९०/ज-१दि. २७/७/२०११.

६. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन ०५/२०११/प्रक्र.९०/ज-१दि. १७/१०/२०११.

७. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.जमीन ०३/२०११/प्रक्र५३/ज-१दि.१२/७/२०११.

क्रमांक २०१५/मशाका/जमा-१/प्र.क्र.३/काची/
जिल्हाधिकारी कार्यालय बीड
दिनांक :- १८/०५/२०१५

## आदेश

ज्या अर्थी कार्यकारी अभियंता(स्थापत्य) स्थापत्य विभाग म.रा.वि.वि.कंपनी मर्या. लातुर यांनी संदर्भीय क्र. ३ अन्वये <u>मौजे इंजेगाव (कौठळी) ता. परळी जि.बीड</u> येथे ३३ के.व्ही उपकेंद्रासाठी <u>मौजे. इंजेगाव (कौठळी) ता. परळी जि.बीड</u> येथील शासकीय गायरान जमीन स.न. २१० मधून ०.८० आर जमीनीची मागणी केली आहे. त्यानुसार उप विभागीय अधिकारी, परळी यांचे पत्र क्र. २०१५/जमा/कावि-३०९ दिनांक २०/०२/२०१५अन्वये प्रस्ताव सादर करुन जमीन मंजूर करणेस शिफारस केली आहे.

त्या अर्थी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम २०,३१नुसार व महाराष्ट्र जमीन महसूल (शासकीय जमीनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ चे नियम ५ ला संदर्भ क्र.५,६,७,८ ला आधिन राहून व उक्त शासन निर्णयातील अटी व शर्तीतस अधीन राहून अन्वये **मौजे. <u>इंजेगाव (कौठळी)</u> ता. परळी जि.बीड** ३३ के.व्ही उपकेंद्र अन्वये मौजे. <u>इंजेगाव (कौठळी)</u> ता. परळी जि.बीड येथील शासकीय गायरान जमीन स.न. ०८ मधून ०.८० आर जमीन कार्यकारी अभियंता(स्थापत्य) स्थापत्य विभाग म.रा.वि.वि.कंपनी मर्या. लातुर यांना आदेशातील अटी व शर्तीस आधीन राहून खालील चतु:सिमा प्रमाणे आगावू ताबा देण्याचे आदेशीत करण्यात येत आहे.

<u>चतु:सिमा</u>

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | :- | ग.नं. /स.नं. २१० मधील उर्वरित जागा व लागून ग.नं. १४८, १५०, १४९, १५०,१५२, १५३ व १५४ |
| पश्चिमेस | :- | ग.नं. /स. नं. २१० मधील उर्वरित जमीन |
| दक्षिणेस | :- | लागुन ग.नं. २१० मधील उर्वरित जमीन व लागून ग. नं. २०९ |
| उत्तरेस | :- | परळी ते सोनपेठ रस्ता |

अटी/ शर्ती

१. जमीनीचा आगावू ताबा दिल्याच्या दिनांकापासून जमीनीचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी म.रा.वि.वि.कंपनीची असेल व जमीनीचा वापर विहीत प्रयोजनासाठी करावयाचा नसेल तर सदरील जमीन शासनाकडे कोणतीही नुकसान भरपाई न मागता परत करण्याची जबाबदारी म.रा. वि कंपनीवर राहील.

२. शासन परिपत्रक क्र. एलएनडी-१०९०/२२०२३१/प्र.क्र.२०० ज-१ दिनांक ५/४/१९९१.अन्वये भागाधिकारी मूल्य ठरविणे/शर्ती व अटी निश्चीत करणे इतर बाबी आगावू ताबा दिल्यानंतर पूर्ण करावयाच्या असल्यामुळे शासन जे भागाधिकार मूल्य निश्चित करेल ते व्याजासह भरण्याचे व जमीन प्रदानाबाबत ज्या अटी व शर्ती असतील त्या तंतोतंत पाळव्या लागतील.

३. सन २०१५ चे भोगाधिकार मूल्याची जी रक्कम देय ठरेल ती रक्कम जमीनीचा आगावू ताबा दिलेल्या दिनांकापासून शासनाचे स्थाई आदेशाप्रमाणे ठरवून दिलेल्या दराने होणा-या व्याजासह शासनाकडे विनाविलंब भरावी.

४. शासकीय जमीनीचे भोगाधिकार मूल्य ठरवणे, शर्ती व अटी निश्चित करणे इत्यादी बाबी आगाऊ ताबा दिल्यानंतर पूर्ण करावयाच्या असल्यामुळे शासन जे भोगाधिकार मूल्य निश्चित करील ते व्याजासह भरण्याचे व मान्य असल्या बद्दल महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीस स्टॅम्प पेपरवर लेखी कबुलायत देणे आवश्यक आहे.

5/12

11-6-15

आवक/जावक
तहसील कार्यालय
परळी-वै.